| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**<br>**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**<br>**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे**<br>**ई मेल - dcphq.pcpc-mh@gov.in** | |
| **प्रेसनोट दिनांक १४/०५/२०२४** | | |

**दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडची कामगिरी**
**अट्टल वाहनचोरी करणाऱ्या टोळीस दरोडा विरोधी पथकाकडुन अटक करून, किं.रू. ६,६५,०००/- रू च्या १४ दुचाकी हस्तगत.**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील वाहन चोरी, घरफोडीचे गुन्हयास प्रतिबंध व्हावा व गुन्हे उघडकीस आणावेत त्या अनुषंगाने वरीष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री बाळकृष्ण सावंत यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस उप निरीक्षक महेश खांडे व दरोडा विरोधी विरोधी पथकाचे अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलयातील उघडकीस न आलेले वाहन चोरीच्या गुन्हयाबाबत माहिती घेवुन, रेकॉर्डवरील आरोपीची माहिती प्राप्त करून, त्यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून, पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील त्यांचे आस्तित्वाबाबत तांत्रिक विश्लेषन करून, गोपनीय माहितीच्या आधारे, वाहन चोरांचा शोध घेत असताना, आळंदी बस स्टॉप आळंदी पुणे या ठिकाणी दोन इसम चोरीची गाडी घेवून येणार असल्याची माहिती पोलीस शिपाई अमर कदम व गणेश कोकणे यांना त्यांचे बातमीदारामार्फत प्राप्त झाली. माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बाळकृष्ण सावंत यांनी सहा पोलीस उप निरीक्षक महेश खांडे यांची एक टिम तयार करून त्यांना कारवाई करणेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे वरील टिमने वरील ठिकाणी सापळा रचला असता माहिती मधील दोन इसम सदर ठिकाणी मिळून आले त्यांना त्यांचा नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे व पत्ते १) शुभम अशोकराव लोंढे वय २१ वर्षे रा. शेळके महाराज यांचे खोलीत खंडोबा मंदीराजवळ, आळंदी पुणे २) सचिन समाधान दळवी वय २३ वर्षे रा. शेळके महाराज यांचे खोलीत खंडोबा मंदीराजवळ, आळंदी पुणे असे असल्याचे सांगितले. त्यास ताब्यात घेवुन दोन्ही आरोपीकडुन विचारपुस करता, त्यांनी **आळंदी पोलीस ठाणे गुरनं ३०८/२०२३ भादवि कलम ३७९ हा** गुन्हा केल्याची कबुली दिल्याने, त्यांना सदर गुन्हयात दिनांक ०९/०५/२०२४ रोजी अटक करण्यांत आली. तसेच त्यांचा तिसरा साथीदार नामे यश शिवाजी भोसले रा. दत्त मंदीराजवळ, आळंदी देवाची जि. पुणे यास दिनाक १०/०५/२०२४ रोजी ताब्यात घेवुन, त्यांच्याकडे अधिक सखोल व बारकाईने चौकशी त्याचा देखील दाखल गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीतांचा पुर्व इतिहास तपासुन, आरोपी आरोपी हे अभिलेखावरील गुन्हेगार असल्याची खात्री झाल्याने, आरोपीतांची दिनांक १४/०५/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडीची रिमांड घेवुन, सखोल व बारकाईने तपास करून, त्यांचेकडुन **एकुण १४ दुचाकी मोटार सायकली** हस्तगत करण्यांत आल्या, सदरच्या मोटार सायकली हस्तगत करण्यांत आल्या आहेत. त्यामध्ये

१) बजाज पल्सर - ०१, २) हिरो स्प्लेंडर - १२, ३) बजाज ॲव्हेंजर - ०१

अटक आरोपींकडुन वरिल चोरीच्या मोटार सायकली बाबत खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | वाहन क्रमांक | वाहन प्रकार |
|---|---|---|---|
| १. | आळंदी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३०८/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच ४४ ए बी ३०७० | हिरो स्प्लेंडर |
| २. | वाळुंज पोलीस ठाणे संभाजीनगर गुन्हा रजि नं. ४०१/२०२४ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच २० डी वाय ६८५८ | बजाज ॲव्हेंजर |
| ३. | म्हाळुंगे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. | एम पी ०७ एन एल २१५१ | हिरो स्प्लेंडर |

| | | | |
|---|---|---|---|
| | गु.र.नं. २८८/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ | | |
| ४. | लोणीकाळभोर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३५८/२०२३भा.द.वि. कलम ३७९ | एम एच १२ एस टी ४१०६ | हिरो स्प्लेंडर |
| ५. | शिक्रापूर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ४६४/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच १२ व्ही ई ९१८९ | हिरो स्प्लेंडर |
| ६. | आळंदी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २६४/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच १४ जे डब्लू १२२६ | हिरो स्प्लेंडर |
| ७. | संगमनेर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. १५६/२०२३ | एम एच १७ सी एल ६८७९ | हिरो स्प्लेंडर |
| ८. | आळंदी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३९१/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच १४ के जी ४६३३ | हिरो स्प्लेंडर |
| ९. | आळेफाटा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. २०३/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच १४ जे जी ३७५४ | हिरो स्प्लेंडर |
| १० | लोणी काळभोर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. २१७/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच १२ टी डब्लू ६६७५ | हिरो स्प्लेंडर |
| ११ | लोणी काळभोर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. /२०२३ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच १२ जी क्यू ६६७५ | हिरो स्प्लेंडर |
| १२ | चिखली पोलीस ठाणे बुलढाणा गुन्हा रजि नं. १६७/२०२३ भा.द.वि. कलम ३७९ | एम एच २८ बी टी १५९५ | हिरो स्प्लेंडर |
| १३ | आळंदी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. १४९/२०२४ | एम एच १२ पी डी ९६१६ | बजाज पल्सर |
| १४ | शिक्रापूर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ५२५/२०२३ भा.द.वि. ३७९ | एम एच ४१ बी डी ३४१९ | हिरो स्प्लेंडर |

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो़, मा. अपर पोलीस आयुक्त श्री.वसंत परदेशी सो़, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. संदीप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री. बाळासाहेब कोपनर, यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री बाळकृष्ण सावंत, पोलीस उप निरीक्षक श्री. भरत गोसावी, तसेच पोलीस अंमलदार महेश खांडे, राहुल खारगे, उमेश पुलगम, विक्रांत गायकवाड, नितीन लोखंडे, आशिष बनकर, प्रविण कांबळे, सागर शेडगे, प्रविण माने, गणेश कोकणे, औदुंबर रोंगे, गोविंद सुपे,अमर कदम व समीर रासकर यांचे पथकाने केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड**